Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

# दैनिक जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादकः मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १२४। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION


**जळगावजिल्ह्यात पोलिसांची धडक कारवाई; अवैध धंद्यांवर मोठा प्रहार**



(पान २ वर)

Selected

## झारखंड विद्यार्थी आंदोलनावर राहुल गांधी आक्रमक

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** झारखंडमध्ये JPSC आणि JSSC परीक्षांमधील कथित अनियमितता, पेपरफुटी आणि निवड प्रक्रियेतील गैरप्रकारांविरोधात विद्यार्थी आंदोलन करत आहेत. परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्यासोबतच या प्रकरणांची CBI चौकशी करण्याची मागणी आंदोलक विद्यार्थ्यांकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विद्यार्थी आंदोलनावर भाष्य करत सरकारला लक्ष्य केलं आहे.पत्रकार परिषदेत राहुल गांधी यांनी झारखंडमधील आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर बळाचा वापर करणं चुकीचं असल्याचं म्हटलं. विद्यार्थ्यांना शांततेच्या मार्गाने आपल्या मागण्या मांडण्याचा आणि आंदोलन करण्याचा अधिकार असल्याचं त्यांनी सांगितलं.

### 20 कंपन्या बंद होणार; एकाचवेळी 4000 लोकांची नोकरी जाणार

# पुण्याच्या IT हबनंतर MIDC मोठ्या संकटात!

## 4000 कर्मचारी बेरोजगार होण्याची भिती ; 1000 कोटींचा फटका

जन सम्राट टाईम्स

**पुणे । पुण्यातील IT हब हे भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे IT हब आहे. विविध कारणांमुळे येथील अनेक IT कंपन्यांना टाळे लागले आहे. तर, अनेक कंपन्या स्थालांतरित होत आहेत. अशातच आता पुण्याचे औद्योगिक क्षेत्र देखील संकटात आहे.**

पुण्यातील चाकण MIDC मधील 20 कंपन्यांना टाळे लागणार आहे. 1000 कोटींचा फटका बसणार आहे. 4000 कर्मचारी बेरोजगार होण्याची भिती वर्तवली जात आहे. मर्सडीज बेंज, फॉक्सवॅगण, स्कोडा, ह्युंदाई यांसारख्या जागतिक कंपन्यांमुळं चाकण MIDC ची एक वेगळी ओळख आहे. पण इथले खड्डे, अभूतपूर्व वाहतूक कोंडी अन होणारे अपघात नित्याचे झालेत. या त्रासाला कंटाळून 20 लघुउद्योगांनी त्यांच्या कंपनीला टाळे लावण्याची प्रक्रिया सुरु केली.या कंपन्या सातारा जिल्ह्यातील खंडाळा MIDC परिसरात स्थलांतरित होणार आहेत. त्यासाठी या वीस कंपन्यांनी संघटना स्थापन केलीये.





त्याद्वारे जागा मिळवण्यासाठी प्रशासकीय पातळीवर हालचाली सुरु केल्यात. या वीस कंपन्या स्थलांतरित झाल्यावर एक हजार कोटींच्या उलाढलीवर परिणाम होणार आहे. चार हजार कर्मचाऱ्यांवर बेरोजगारीची कुऱ्हाड पडणार आहे. चाकण आणि परिसरातील अभूतपूर्व वाहतूक कोंडीतून सुटका होत नसल्यानं चाकण MIDC ला हा मोठा फटका बसायला सुरुवात झाली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातल्या गोंडपिपरी तालुक्यातील करंजी आणि आजूबाजूच्या बारा गावातील सुपीक जमीन एमआयडीसी करीता मातीमोल भावाने अधिग्रहित करून खाजगी उद्योगाच्या घशात घालण्याच्या प्रकाराचा विरोध म्हणून मोर्चा, आंदोलने, दोन शेतकरी परिषदा, हायकोर्टात याचिकेची पूर्वतयारी या सगळ्या प्रकारानंतर अंतिम उपाय म्हणून शेतकऱ्यांनी एमआयडीसी रद्द करण्यासाठी स्पीड पोस्टाने हजारो पत्र पाठवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी, तालुक्यातील करंजी, आक्सापूर, वडकुली, चेकवडकुली, वढोली, शिरशी देऊळवार, चेकबेरडी, बोरगाव, धानापूर, चेक बोरगाव, चेक पेलूर, लिखितवाडा, खराडपेठ या 13 गावातील शेतकऱ्यांनी यासंदर्भात एका पत्रपरिषदेत आपली व्यथा मांडली. कोणतीही पूर्वकल्पना न देता ग्रामपंचायत स्तरावर कोणत्याही ग्रामसभेचे आयोजन न करता शासनाने अचानक एमआयडीसी करता दहा हजार एकर जमीन अधिग्रहित करायची असल्याचे राजपत्र २५/०२/२०२६ ला प्रसिद्ध केले. दहा हजार एकर जमीन अधिग्रहित करणे म्हणजे या 13 गावातल्या संपूर्ण शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करून त्यांना भूमिहीन करणे तालुक्याच्या नकाशातून ती गावेच कमी करण्याचा प्रकार आहे.

### 20 कंपन्या स्थलांतरित होणार

या 13 ही गावांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, एसबीसी आणि प्रवर्गातील लोक मोठ्याप्रमाणावर शेतकरी आहेत. ज्यांच्या अनेक पिढ्या शेतीत राहून कुटुंबाची गुजराल करीत आहेत. त्यांना अचानकपणे विश्वासात न घेता शेतकऱ्यांना शेतमालक असताना हक्कातून बेदखल करून त्यांच्या पुनर्वसनाचा कुठलाही आराखडा न देता ही गावेच तालुक्याच्या नकाशातून संपुष्टात आणण्याचा, शासनाचा हा प्रकार पाहून शेतकरी प्रचंड भयभीत झाले आहेत.

## हरित, स्वच्छ आणि हवामान-सक्षम जळगावच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल!

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | (प्रतिनिधी):** हरित, स्वच्छ आणि हवामान-सक्षम जळगावच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत जळगाव महानगरपालिकेतर्फे 'जळगाव सिटी क्लायमेट ॲक्शन प्लॅन' आणि 'हीट ॲक्शन प्लॅन'चे प्रकाशन करण्यात आले. यावेळी शहरातील १९ प्रभागांमध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. हवामान बदलाच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी कृती आराखडा 'सिटी क्लायमेट ॲक्शन प्लॅन'च्या माध्यमातून शहरातील स्वच्छ हवा, शाश्वत जलव्यवस्थापन, हरित क्षेत्रवाढ, जलसंधारण आणि सार्वजनिक आरोग्य यांना चालना देण्यासह हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेण्यासाठी विविध उपाययोजनांना दिशा मिळणार आहे.शहराच्या भविष्यातील विकासाचे नियोजन करताना पर्यावरणीय समतोल राखणे आणि हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचा सामना करणे, हा या आराखड्याचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे. उष्णतेच्या लाटेपासून नागरिकांच्या संरक्षणावर भर



वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर 'हीट ॲक्शन प्लॅन' तयार करण्यात आला आहे.

या माध्यमातून उष्णतेच्या लाटेचा नागरिकांच्या आरोग्यावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात येणार आहेत. उष्णतेपासून बचाव, नागरिकांचे आरोग्य संरक्षण आणि आवश्यक त्या वेळी तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी या आराखड्याचा उपयोग होणार आहे.

मनपा कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे; रोड स्विपिंग मशीनचे अनावरण कार्यक्रमादरम्यान २२ मनपा कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रे आणि गणवेशाचे वाटप करण्यात आले. तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी रोड स्विपिंग मशीनचे अनावरण करण्यात आले.

याशिवाय मनपा आरोग्य विभागाच्या ६ वाहनांचे उद्घाटन करण्यात आले. या वाहनांमुळे शहरातील आरोग्यविषयक सेवा आणि संबंधित कामकाजाला अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे. १९ प्रभागांत वृक्षारोपण पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी जळगाव शहरातील १९ प्रभागांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासोबतच वाढते तापमान, प्रदूषण आणि हवामान बदलाच्या परिणामांना सामोरे जाण्यासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि हवामान कृती ही केवळ शासन किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## पंतप्रधानांसोबतच्या भेटीचा संबंध NDA प्रवेशाशी जोडणे योग्य नाही

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या आठ खासदारांनी सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. खासदारांच्या भेटीनंतर डॉ. अमोल कोल्हे यांनी माध्यमांशी संवाद साधला. या भेटीत कुठलीही राजकीय चर्चा झाली नाही, असे कोल्हे यांनी स्पष्ट केले. लोकसभेच्या आठही मतदारसंघांतील प्रश्न खासदारांनी पंतप्रधानांसमोर मांडले. खासदार नीलेश लंके यांनी आरोग्य क्षेत्राशी संबंधित अनेक मुद्दे पंतप्रधानांसमोर मांडल्याचे त्यांनी सांगितले. पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्प, इंद्रायणी मेडिसिटी, चाकण एमआयडीसीसह मतदारसंघांतील विविध प्रश्नांवर चर्चा झाल्याचे कोल्हे यांनी स्पष्ट केले. यापूर्वी संबंधित मंत्र्यांची भेट घेऊनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने योग्य ठिकाणी हे मुद्दे मांडण्यात आल्याचे ते म्हणाले. पंतप्रधानांसोबतच्या या भेटीचा संबंध लगेचच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या एनडीएतील प्रवेशाशी जोडणे योग्य नाही, असेही कोल्हे यांनी स्पष्ट केले.

## 'शुद्ध पेट्रोल तुझ्या बापाच्या घरून येणार का?'

**भोपाळ :** पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणावरून देशात चर्चा सुरू असतानाच भाजपच्या एका खासदाराच्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटलं आहे. जनार्दन मिश्रा यांनी इथेनॉल मिश्रणाला विरोध करणाऱ्यांवर टीका करताना आक्षेपार्ह भाषेचा वापर केला. त्यांच्या वक्तव्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर चर्चेत आला आहे. आयोजित कार्यक्रमात जनार्दन मिश्रा नागरिकांना संबोधित करत होते. यावेळी त्यांनी देशातील इंधनाची गरज, कच्च्या तेलाची आयात आणि इथेनॉल मिश्रणाबाबत आपली भूमिका मांडली.

## मराठा आरक्षणाचा आणखी एक बळी

जन सम्राट टाईम्स

**मुंबई/पुणे | प्रतिनिधी :** मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर मराठा समाजाला देण्यात आलेली कुणबी प्रमाणपत्रे अवैध ठरवण्यात येत असल्याच्या विवंचनेतून जिंतूर तालुक्यातील भोशी गावात राहणाऱ्या गणेश ठोंबरे या युवकाने गळफास घेत आत्महत्या केली आहे. आत्महत्या करण्यापूर्वी गणेशने चिठ्ठी लिहीत, आरक्षण मिळत नसल्याने आपण आत्महत्या करत असल्याचं नमूद केलं आहे.

तसेच सरकारने तात्काळ आरक्षणाचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी देखील त्याने केली आहे.दरम्यान या घटनेनंतर परिसरात शोककळा पसरली असून,आत्महत्येपूर्वी गणेश मागील काही दिवसापासून मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून नैराश्येत होता. अनेकदा त्याने मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर जरांगे पाटलांना वेळोवेळी उपोषण का? करावं लागते, असा प्रश्न देखील मित्र मंडळी आणि नातेवाईकांकडे केला होता. या प्रश्नावरून अनेकदा मित्र आणि नातेवाईकांकडून गणेशची समजूत देखील काढण्याचा प्रयत्न झाला.

मात्र आरक्षण मिळणारचं नाही, हा मुद्दा गणेशच्या मनात एवढ्या खोल घर करून बसला होता की, अखेर गणेशने आत्महत्या सारखं टोकाचे पाऊल उचललं अशी माहिती गणेशच्या नातेवाईकांकडून देण्यात आली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन करून देखील आरक्षणाचा प्रश्न सुटत नाही, यामुळे गणेशला नैराश्य आलं होतं. त्यामुळे त्याने टोकाचं पाऊल उचललं आहे.

या घटनेमुळे जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान सरकारने आता मराठा आरक्षणाचा मार्ग कायमचा मोकळा करून द्यावा. अशी मागणी गणेशच्या नातेवाईकांकडून करण्यात आली आहे.

मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर 29 ऑगस्टपासून आंदोलनाची हाक दिली आहे. कुणबी प्रमाणपत्र रद्द होत असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांच्याकडून करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे, तसेच एकनाथ शिंदे यांच्यावर देखील टीका केली आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला मदतीचा हात

### महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व प्रज्ञावंत फाउंडेशनचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई आणि प्रज्ञावंत फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'ज्ञानदीप' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. नियोजन भवन, जळगाव येथे आयोजित कार्यक्रमात गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांना वर्षभर शैक्षणिक मदत उपलब्ध करून देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये आणि प्रत्येक



गरजू विद्यार्थ्याच्या जीवनात 'ज्ञानाचा दीप' प्रज्वलित व्हावा, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत यावेळी जिल्हाधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांना मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा योग्य उपयोग करून मनापासून अभ्यास करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले. शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मिळणारी मदत ही केवळ वस्तूंचे वाटप नसून त्यांच्या भविष्यातील वाटचालीला बळ देणारी आहे. गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई आणि प्रज्ञावंत फाउंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने 'ज्ञानदीप' अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. वर्षभर राबविणार 'ज्ञानदीप' अभियान 'ज्ञानदीप' अभियानाच्या माध्यमातून गरजू विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्य व आवश्यक मदत पोहोचविण्याचा प्रयत्न वर्षभर सुरू ठेवण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणात सातत्य राखण्यास मदत होणार आहे. "एका विद्यार्थ्याच्या शिक्षणाला दिलेली मदत म्हणजे त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी पेटवलेला ज्ञानाचा दीप," या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.


वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज

दैनिक जन सत्याचे प्राईम्स सम्राट टाईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...

डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!

- तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
- समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
- तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत
- पोहोचवायच्या आहेत का?

मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!


महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत

अनुभव असो वा नसो

– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा

डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध

तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ



संपर्क करा (Call / WhatsApp)

+91 93254 87889 / 9270187889

- संपादक -

मुकुंदराव शामराव नंन्नवरे

ईमेल : Jansamrattimes@gmail.com -

वेबसाईट : https://jansamrattimes.in

आजच संपर्क करा...

तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# जळगाव जिल्ह्यात पोलिसांची धडक कारवाई; अवैध धंद्यांवर मोठा प्रहार, 24 लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त!

## हातभट्टी दारूविरोधात ८२ गुन्हे; २२ हजार लिटरहून अधिक गावठी दारू व साहित्य जप्त

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी जळगाव पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत धडक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत हातभट्टी व गावठी दारू निर्मिती-विक्री, नियमबाह्य पान टपऱ्या तसेच संशयास्पद भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत २४ लाख १३ हजार ७३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला, तर विविध प्रकरणांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हातभट्टी दारूविरोधात ८२ गुन्हे जिल्ह्यात हातभट्टी व गावठी दारूची निर्मिती करणाऱ्यांविरोधात दारूबंदी कायद्यान्वये एकूण ८२ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ८२ आरोपींवर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान तब्बल २२ हजार २३ लिटर गावठी दारू, तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारी रसायने व साहित्य असा एकूण २४,१३,७३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला. १७७ पान टपऱ्यांवर COPTA कायद्यान्वये कारवाई तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन करणाऱ्या पान टपऱ्यांवरही पोलिसांनी कारवाई केली. COPTA Act अंतर्गत जिल्ह्यातील १७७ पान टपऱ्यांवर कारवाई करून दंड आकारण्यात आला. यापैकी



नियमांचा भंग करणाऱ्या ३१ पान टपऱ्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. ११३ भंगार दुकानांची तपासणी चोरीचा माल किंवा संशयास्पद वस्तूंची खरेदी-विक्री होऊ नये, यासाठी जिल्ह्यातील ११३ भंगार दुकानांची विशेष तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान सात दुकानांमध्ये मालाच्या स्रोताबाबत संशयास्पद माहिती आढळून आल्याने संबंधित दुकानमालकांविरुद्ध मुंबई पोलीस अधिनियम कलम १२४ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रकार संख्या कारवाई हातभट्टी व गावठी दारू ८२ गुन्हे ₹२४.१३ लाखांचा मुद्देमाल जप्त व नष्ट ३१ टपऱ्यांवर निष्कासन भंगार दुकाने ११३ तपासणी दुकानांवर कलम १२४ अन्वये गुन्हे अवैध धंदे आढळल्यास पोलिसांशी संपर्काचे आवाहन जिल्ह्यातील अवैध हातभट्टी व गावठी दारू निर्मिती-विक्री, पान टपऱ्यांवरील नियमभंग तसेच चोरीच्या मालाची खरेदी-विक्री रोखण्यासाठी ही मोहीम पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. जिल्ह्यात कुठेही अशा प्रकारचे अवैध व्यवसाय सुरू असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी न घाबरता जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी केले आहे. जळगाव जिल्ह्यातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी जळगाव पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेत धडक कारवाई केली आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या मोहिमेत हातभट्टी व गावठी दारू निर्मिती-विक्री, नियमबाह्य पान टपऱ्या तसेच संशयास्पद भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली. या कारवाईत २४ लाख १३ हजार ७३० रुपये किमतीचा मुद्देमाल हातभट्टी दारूविरोधात ८२ गुन्हे जिल्ह्यात हातभट्टी व गावठी दारूची निर्मिती करणाऱ्यांविरोधात दारूबंदी कायद्यान्वये एकूण ८२ गुन्हे दाखल करण्यात आले असून, ८२ आरोपींवर कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान तब्बल २२ हजार २३ लिटर गावठी दारू, तसेच दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारी रसायने व साहित्य असा एकूण २४,१३,७३० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून नष्ट करण्यात आला.

# टाटा मोटर्सच्या भारतातील पहिल्या बॅटरी इलेक्ट्रिक ट्रक श्रेणीचे अनावरण

जन सम्राट टाईम्स

**मुंबई/पुणे | प्रतिनिधी:** भारताच्या हरित आणि शाश्वत वाहतूक क्षेत्रात महत्त्वाची भर पडली असून, Tata Motorsच्या ७ ते ५५ टन क्षमतेच्या बॅटरी इलेक्ट्रिक ट्रक्सच्या श्रेणीचे अनावरण राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी बोलताना मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, हा केवळ नवीन इलेक्ट्रिक ट्रक्सच्या अनावरणाचा कार्यक्रम नसून भारताच्या हरित आणि शाश्वत वाहतूक क्रांतीतील महत्त्वाचा टप्पा आहे. बॅटरी आणि इलेक्ट्रिक ट्रक्ससाठी स्वतंत्र धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरल्याचे त्यांनी नमूद केले. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत'चे उदाहरण या इलेक्ट्रिक ट्रक्सची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांची पुण्यात भारतीय अभियंत्यांकडून रचना व विकास करण्यात आला आहे. भारतीय कौशल्य, आधुनिक तंत्रज्ञान आणि देशांतर्गत उत्पादनक्षमता यांचा प्रभाव या वाहनांमधून दिसून येतो. "हे इलेक्ट्रिक ट्रक म्हणजे 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनांचे उत्तम उदाहरण आहे. भारतीय अभियंत्यांची क्षमता आणि प्रगत तंत्रज्ञानाची ताकद यामुळे अशा प्रकारची वाहने देशात विकसित होत आहेत," असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. EV उद्योगासाठी महाराष्ट्रात अनुकूल वातावरण महाराष्ट्र शासनाने राज्यात इलेक्ट्रिक वाहन उद्योगाच्या विकासासाठी अनुकूल धोरणात्मक वातावरण निर्माण करण्यावर भर दिला आहे. EV धोरणामुळे वाहन उत्पादकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासासाठी प्रोत्साहन मिळत असून उद्योग आणि वाहतूक क्षेत्रासाठी नव्या संधी उपलब्ध होत आहेत. ७ ते ५५ टन क्षमतेच्या अवजड इलेक्ट्रिक ट्रक्सच्या या श्रेणीमुळे देशातील मालवाहतूक क्षेत्राला पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होणार आहे. इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासोबतच प्रदूषणात घट आणि इंधन खर्चात बचत होण्यास या तंत्रज्ञानाची मदत होण्याची अपेक्षा आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# महिला ग्रामसंघाच्या बैठकीत कृषी विभागाच्या योजनांवर मार्गदर्शन

## उमेद अभियानाअंतर्गत मासिक बैठक



जन सम्राट टाईम्स

**शहादा | प्रतिनिधी:** नियमानुसार मलोणी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ उत्साहात पार पडली. या बैठकीमध्ये कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देत शेतकरी महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. मलोणी गावातील अनेक महिला बचत गटांच्या माध्यमातून जोडल्या गेल्या असून, त्यांना कृषी विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळावा, या उद्देशाने तालुका व्यवस्थापक ईश्वर जगदाळे व प्रभाग समन्वयक सुचिता सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली नवनाथ महिला ग्रामसंघातर्फे तालुका कृषी विभागातील कृषी सहाय्यक गौतम खेडकर यांना विशेष निमंत्रित करण्यात आले होते. बैठकीची सुरुवात नियमानुसार ग्रामसंघ प्रार्थना,उपस्थितांचा परिचय,मागील सभेचे इतिवृत्त वाचन आणि या महिन्यातील आर्थिक व्यवहारांचा आढावा व निर्णय घेतल्यानंतर तालुका कृषी विभागातील आलेले कृषी सहाय्यक गौतम खेडकर यांनी आपला परिचय देऊन कृषी विभागाच्या विविध योजनांवर सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने: प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, महाडीबीटी अंतर्गत कृषी यांत्रिकीकरण योजना, ठिबक व तुषार सिंचन योजना, शेतकरी गटांसाठी कृषी अवजारे बँक योजना, यांसह शेतकऱ्यांसाठी अत्यंत लाभाच्या ठरणार्या अनेक योजनांची सविस्तर माहिती देऊन योजनाचा लाभ घ्यावा असे कृषी सहाय्यक गौतम खेडकर यांनी सांगितले. यावेळी शेतकरी महिलांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे व शंकांचे कृषी सहाय्यकांनी समाधानकारक निरसन केले. आज मिळालेली माहिती सर्व महिलांपर्यंत पोहोचावी यासाठी ग्रामसंघातील सर्व पदाधिकारी व सदस्यांनी आपापल्या बचत गटांतील इतर महिलांना या योजनांची माहिती देण्याचे सर्वानुमते ठरवले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी ग्रामसंघाच्या पदाधिकाऱ्यांनी कृषी सहाय्यकांचे आभार मानले. या बैठकीला ग्रामसंघाचे सर्व पदाधिकारी, सदस्य आणि आय.सी.आर.पी. शितल मोहिते यांच्यासह विविध गटांतील महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या.

# संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त संभाजीनगरात कलश मिरवणूक

## 'श्री गुरु रविदास समरसता संकल्प अभियाना'ला उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**संभाजीनगर | प्रतिनिधी:** समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश घराघरात पोहोचविण्याचा संकल्प प्रतिनिधी : जॉन भालेराव : जगतगुरू संत शिरोमणी श्री गुरु रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त देशभर राबविण्यात येत असलेल्या 'श्री गुरु रविदास समरसता संकल्प अभियाना'चा छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहात प्रारंभ करण्यात आला. कासलीवाल गार्डन येथे भव्य कलश पूजन आणि रथ मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा विचार जनमानसापर्यंत पोहोचविणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. कलश पूजनानंतर शहरातून भव्य रथ मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत नागरिक, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच चर्मकार समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते कलश वितरण सोहळा पार पडला. मान्यवरांची मोठी उपस्थिती



या कार्यक्रमास भाजपा राष्ट्रीय महामंत्री दुष्यंतकुमार गौतम, समरसता संकल्प अभियानाच्या संयोजिका आमदार माधवीताई नाईक, माजी पालकमंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर, फुलंब्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार अनुराधाताई अतुल चव्हाण, भोकरदन विधानसभा मतदारसंघाचे आमदार संतोष पाटील दानवे, भाजपा अनुसूचित मोर्चा प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड, माजी आमदार राम सातपुते, माजी केंद्रीय अर्थमंत्री डॉ. भागवत कराड, आमदार सुहास शिरसाट, आमदार किसन वानखेडे, माजी उपमहापौर भगवान घडामोडे, महापौर समीर दादा राजूरकर, जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल भैया लोणीकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संत-महंतांच्या उपस्थितीने भक्तिमय वातावरण महंत नागराज बाबांचे शिष्य महंत दिवाकर बाबाजी, संत एकनाथ महाराजांचे वंशज ह.भ.प. रावसाहेब महाराज गोसावी, वीर शौर्य संप्रदायाचे डॉ. वीरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्यासह विविध संप्रदायांचे संत-महंत, महाराज आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली. संत-महंत, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांच्या मोठ्या उपस्थितीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. 'संत रविदासांचे विचार घराघरात पोहोचविणार' यावेळी भाजपा अनुसूचित मोर्चा प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड म्हणाले.

# कुंभमेळ्याच्या नावाखाली ४००-५०० कोटींच्या बनावट वर्क ऑर्डरचा दावा!

## 'जामनेर कनेक्शन'मुळे खळबळ ठेकेदारांकडून पैसे उकळल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** नाशिक येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या कामांच्या नावाखाली ठेकेदारांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कुंभमेळ्याच्या विविध कामांसाठी बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांकडून पैसे उकळल्याचा आरोप करण्यात आला असून, या बनावट कागदपत्रांची एकूण किंमत तब्बल ४०० ते ५०० कोटी रुपये असल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे जळगाव जिल्ह्यासह नाशिक परिसरात खळबळ उडाली आहे. महापालिका आणि कुंभमेळा प्राधिकरणातील अधिकाऱ्यांच्या नावाचा गैरवापर? कुंभमेळ्याची कामे ऑनलाइन प्रक्रियेद्वारे होत असताना काही व्यक्तींनी नाशिक महापालिका आणि कुंभमेळा प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाचा गैरवापर करून बनावट कागदपत्रे आणि वर्क ऑर्डर तयार केल्याचा आरोप तक्रारदार ठेकेदारांनी केला आहे. या बनावट वर्क ऑर्डरच्या आधारे ठेकेदारांकडून मोठ्या रकमा घेतल्याचेही तक्रारदारांनी सांगितल्याची माहिती समोर आली आहे. काही कागदपत्रांमध्ये आवश्यक असलेल्या QR कोडबाबतही विसंगती आढळल्याने ठेकेदारांना कागदपत्रांच्या सत्यतेबाबत संशय निर्माण झाला आणि त्यानंतर हा प्रकार उघडकीस आल्याचे सांगण्यात येत आहे. गिरीश महाजनांकडे ठेकेदारांची धाव फसवणुकीचा संशय आल्यानंतर काही ठेकेदारांनी ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेऊन या प्रकाराची तक्रार केल्याचे सांगण्यात येत आहे. तक्रारीनंतर महाजन यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रशासनाला चौकशीच्या सूचना दिल्याचे समोर आले आहे. महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणातील संशयितांचे 'जामनेर कनेक्शन' असल्याचा आरोप पुढे आला आहे. जामनेर तालुक्यातील दोन, जळगाव शहरातील एक आणि धुळ्याशी संबंधित एका व्यक्तीचा या प्रकरणात सहभाग असल्याचा आरोप तक्रारदारांकडून करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वीही ३५ कोटींच्या बनावट वर्क ऑर्डरचे प्रकरण दरम्यान, नाशिक कुंभमेळ्याच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर तयार करण्याचा प्रकार यापूर्वीही समोर आला होता. एप्रिल २०२६ मध्ये विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या बनावट डिजिटल स्वाक्षरीचा वापर करून सुमारे ३५ कोटी रुपयांच्या दोन बनावट वर्क ऑर्डर तयार केल्याप्रकरणी नाशिकरोड पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता. त्यामुळे आता पुन्हा एकदा ४०० ते ५०० कोटी रुपयांच्या बनावट वर्क ऑर्डर्सचा दावा समोर आल्याने या प्रकरणाची व्याप्ती किती मोठी आहे, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. चौकशीकडे लक्ष कुंभमेळ्याच्या कामांच्या नावाखाली नेमक्या किती बनावट वर्क ऑर्डर तयार करण्यात आल्या? त्यातून ठेकेदारांकडून किती रक्कम उकळण्यात आली?

# तंबाखूमुक्त आरोग्यसंपन्न शाळेसाठी विद्यार्थ्यांची प्रभातफेरी

## बोदवडमधील सर सत्यजित राम नेमाडे विद्यालयात तंबाखूमुक्त अभियानाचे उद्घाटन

जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी:** बोदवड येथील सर सत्यजित राम नेमाडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी तंबाखूमुक्त अभियानाचे उत्साहात उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये तंबाखू सेवन व विविध प्रकारच्या व्यसनांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनंतराव कुलकर्णी होते. बोदवड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आशिष लव्हंगडे यांच्या हस्ते तंबाखूमुक्त अभियानाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बोदवड पोलिस ठाण्याच्या पीएसआय स्वाती एडके, सामाजिक वनीकरण विभागाचे आरएफओ सौरव पाटील, बोदवड नगरपालिकेचे सीईओ सतीश पुदाके, माजी नगराध्यक्ष सईद बागवान, न. ह. रांका हायस्कूलचे एनसीसी प्रमुख सावळे सर, तंबाखूमुक्त अभियानाचे तालुका समन्वयक तथा रेणुका माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक मराठे सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. जी. हजारी यांच्यासह शिक्षक व यश आले.

# कौटुंबिक मालमत्ता हस्तांतरण अधिक सुलभ!

## बक्षीसपत्राच्या नोंदणीसाठी २०० रुपये

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** कौटुंबिक मालमत्तेचे हस्तांतरण अधिक सुलभ, किफायतशीर आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाच्या महसूल विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नोंदणी अधिनियम, १९०८ अंतर्गत जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेनुसार, विशिष्ट कौटुंबिक नात्यांमध्ये निवासी किंवा कृषी मालमत्ता बक्षीसपत्राद्वारे (Gift Deed) हस्तांतरित करताना आता केवळ २०० रुपये नोंदणी शुल्क आकारले जाणार आहे. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या नातेसंबंधांना मिळणार लाभ शासनाच्या निर्णयानुसार, खालील कौटुंबिक नात्यांमध्ये निवासी किंवा कृषी जमीन बक्षीसपत्राद्वारे हस्तांतरित केल्यास २०० रुपये नोंदणी शुल्काचा लाभ मिळणार आहे— पती आणि पत्नी मुलगा आणि मुलगी नातू आणि नात मयत मुलाची पत्नी (विधवा सून) यामुळे कुटुंबातील मालमत्ता एका सदस्याकडून दुसऱ्या सदस्याकडे हस्तांतरित करताना नोंदणी प्रक्रियेवरील आर्थिक भार मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. कौटुंबिक मालमत्ता हस्तांतरणाला मिळणार चालना



कौटुंबिक मालमत्तेच्या हस्तांतरणासाठी मोठ्या प्रमाणात शुल्क आणि इतर खर्च येत असल्याने अनेक कुटुंबांमध्ये मालमत्ता हस्तांतरणाची प्रक्रिया रखडत होती. नव्या निर्णयामुळे अशा कुटुंबांना आर्थिक दिलासा मिळणार असून, मालमत्तेचे कायदेशीर हस्तांतरण अधिक सुलभ आणि किफायतशीर होण्यास मदत होणार आहे. विशेषतः शेतजमीन किंवा निवासी मालमत्ता पुढील पिढीकडे अथवा कुटुंबातील पात्र सदस्याकडे हस्तांतरित करू इच्छिणाऱ्या नागरिकांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. नागरिकाभिमुख निर्णय या निर्णयामुळे कौटुंबिक मालमत्ता हस्तांतरणाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासोबतच नागरिकांना अनावश्यक आर्थिक भारापासून दिलासा मिळणार आहे. तसेच, मालमत्तेचे हस्तांतरण कायदेशीर आणि अधिकृत पद्धतीने नोंदविण्यास प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवण्यासाठी म्युनिसिपल हायस्कूलचा उपक्रम

## घरोघरी जाऊन पालकांशी संवाद; 'पाल्याला नियमित शाळेत पाठवा'चे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळणे, शाळेतील उपस्थिती वाढविणे आणि शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे या उद्देशाने नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळच्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अनोखा उपक्रम राबविला. 'शिक्षण आपल्या दारी' या संकल्पनेतून शिक्षकांनी भानखेळा आणि तिघरा या गावांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांच्या घरोघरी पालकांच्या भेटी घेतल्या. या गावांमधील अनेक पालकांचा उदरनिर्वाह हातमजुरीवर अवलंबून



आहे. भुसावळ येथील शाळेत आयोजित पालक सभेला उपस्थित राहण्यासाठी त्यांना ये-जा करण्यासाठी सुमारे ५० रुपये खर्च येतो. त्याचबरोबर बैठकीसाठी एक दिवसाचा रोजगारही बुडतो. त्यामुळे पालकांना शाळेतील बैठकींना उपस्थित राहण्यात अडचणी येत असल्याचे लक्षात घेऊन शाळेच्या वतीने गावातील प्राथमिक शाळेतच पालक-शिक्षक सभा आयोजित करण्यात आली. नियमित उपस्थितीवर भर सभेत डॉ. प्रदीप साखरे यांनी पालकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी दररोज नियमितपणे शाळेत उपस्थित राहणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नियमित उपस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येते आणि त्यांच्या गुणवत्तेतही सुधारणा होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. पालकांनी आपल्या पाल्याने शाळेत दिलेला गृहपाठ आणि अभ्यास पूर्ण केला आहे की नाही, याची दररोज विचारपूस करावी. विद्यार्थ्यांच्या अभ्यासाकडे लक्ष देऊन त्यांना नियमितपणे शाळेत पाठवावे, असे आवाहनही करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासात शिक्षकांप्रमाणेच पालकांची भूमिकाही महत्त्वाची आहे, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. शिक्षक-पालक संघाचे सचिव नाना पाटील यांनी शिक्षक-पालक संघाच्या कार्याची माहिती पालकांना दिली. शासकीय योजनांची माहिती शाळेचे मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने यांनी पालकांना आगामी परीक्षेबाबत आवश्यक मार्गदर्शन केले योजनांची माहिती देत या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी नियमितपणे शाळेत उपस्थित राहून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकून राहणे गरजेचे आहे, असे सांगत पालकांनी आपल्या पाल्याला नियमित शाळेत पाठवावे, असेही मुख्याध्यापक सुलताने यांनी आवाहन केले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# महाकवी वामनदादा कर्डक जयंतीनिमित्त 'मी राजगृहातील रमाई बोलतेय' एकपात्री प्रयोग

## स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर वैचारिक कवी संमेलनाचेही आयोजन

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी:** महाकवी वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त तसेच भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रमाई फाऊंडेशन, रमाई मासिक, रमाई प्रकाशन आणि लोकनेते भय्यासाहेब तथा यशवंतराव आंबेडकर प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष सांस्कृतिक व वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत 'मी राजगृहातील रमाई बोलतेय' हा एकपात्री प्रयोग तसेच 'तरी आम्ही बोलू नये' या वैचारिक कवी संमेलनाचे आयोजन शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, रॉक्सी टॉकीजजवळ, सन्मित्र कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले आहे. ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. दिलीप महालिंगे यांच्या हस्ते उद्घाटन कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. दिलीप महालिंगे यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय मून राहणार आहेत. यावेळी पुणे येथील कवी आकाश अप्पा सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला ठेवण्यात आला आहे. 'मी राजगृहातील रमाई बोलतेय' एकपात्री प्रयोग 'मी राजगृहातील रमाई बोलतेय' हा एकपात्री प्रयोग पुणे येथील प्रा. रमणी बबिता आकाश सादर करणार आहेत. रमाईच्या जीवनातील संघर्ष, त्याग, सामाजिक जाणिवा आणि बाबासाहेब




आंबेडकरांच्या कार्यातील त्यांच्या योगदानाचा भावनिक व वैचारिक पट या प्रयोगातून उलगडणार आहे. 'तरी आम्ही बोलू नये' वैचारिक कवी संमेलन यासोबतच 'तरी आम्ही बोलू नये' या वैचारिक कवितांच्या कार्यक्रमात प्रा. रमणी, श्रेया वाघ, अनिषा दोडके, जित्या जाली, किरण प्रकाश, स्वराज समदूर, विजय लोखंडे, प्रशिक तायडे, किशोर चक्रनारायण, सुमेध वंदना मधुकर, सुभाष गवळी आणि शुभम आव्हाळे आदी कवी सहभागी होणार आहेत. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास मंगल खिवंसरा, डॉ. ऋषीकेश कांबळे, ॲड. एस. आर. बोदडे, डॉ. धनराज गोंडाणे, ॲड. डी. व्ही. खिल्लारे, प्रा. विजयकुमार गवई, भीमराव सरवदे, ॲड. धनंजय बोरडे, प्राचार्य सुनील वाकेकर, प्राचार्य डॉ. नवनाथ गोरे, प्राचार्य डॉ. प्रमोद हेरोडे, सुमीत भुईगळ, ॲड. रामेश्वर तायडे, रूपचंद गाडेकर, सतीश गायकवाड, करुणा जाधव, डॉ. प्रमोद दुथडे, दौलत मोरे, इंजि. बी. के. आदमाने, डॉ. अरविंद गायकवाड, सुधाकर झिने, इंजि. एस. एस. भगत, इंजि. अशोक येरेकर, प्राचार्य डॉ. यशवंत खडसे, डॉ. भगवान धांडे, डॉ. कैलासचंद्र बनसोडे, एकनाथ पाखरे, मधुकर गवंदे, अंबादास रगडे, अनिलकुमार गायकवाड, व्ही. के. वाघ, डॉ. राजेंद्र अंकुशे, अशोक तिनगोटे, भीमराव बनसोड, ॲड. संदीप थोरात, स. सो. खंडाळकर, जनार्दन म्हस्के, डॉ. धोंडोपंत मानवतकर, सूर्यभान गजभिये (सोलापूर), रतनकुमार साळवे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी करण्यासाठी मुख्य संयोजक रमाई मासिकाच्या संपादक प्रा. डॉ. रेखा मेश्राम यांच्यासह दैवशीला गवंदे, शारदा गजभिये, शोभा खाडे, ललिता खडसे, बेबीनंदा पवार, राजकन्या गोंडाणे, मंगल मून, डॉ. ललिता गिहे, डॉ. वंदना पाटील, सुनंदा जाधव, सुरेखा चौरपगार, रत्नकला बनसोड, संघमित्रा खंडाळकर, सविता अभ्यंकर, जयश्री सरोदे, सरला सदावर्ते, चंद्रप्रभा शेगावकर, गंगाबाई सुरडकर, संध्या साळवे, फुलराणी वानखडे, मनिषा अंकुशराव, स्नेहा बनसोडे, विद्या साळवे, शारदा पगारे, मनिषा निसर्ग, मैना बोदडे, ज्योती निंबाळकर आदी परिश्रम घेत आहेत. या वैचारिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# हिंदूयुवासेनेच्याआंदोलनानंतर प्रशासनॲक्शनमोडवर!




जन सम्राट टाईम्स


**धुळे | प्रतिनिधी :** हिंदू युवा सेनेने जेल रोडवरील अतिक्रमणांविरोधात घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर धुळे महानगरपालिका प्रशासन ॲक्शन मोडवर आले. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने पोलिस बंदोबस्तासह जेल रोडवर कारवाई करत विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनी उभारलेली अतिक्रमणे हटविली. या कारवाईदरम्यान अतिक्रमण हटविण्यास विरोध करणाऱ्या संविधान सेनेच्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेत शहर पोलीस ठाण्यात नेले. हिंदू युवा सेनेच्या आंदोलनाला यश आल्याचा दावा पाच कंदील मार्केट हटविल्यानंतर तेथील व्यापाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी प्रशासनाने जेल रोड परिसरात पर्यायी जागा उपलब्ध करून दिली होती. मात्र, कालांतराने या जागेवर विविध राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी कार्यालये व इतर स्वरूपाचे अतिक्रमण केल्याचा आरोप करण्यात आला. महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या पथकाने पोलिस बंदोबस्तासह जेल रोडवर कारवाई करत विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांनी उभारलेली अतिक्रमणे हटविली. या कारवाईदरम्यान अतिक्रमण हटविण्यास विरोध करणाऱ्या संविधान सेनेच्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेत शहर पोलीस ठाण्यात नेले.

---

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स — ब्रेक न्यूज — ज

# जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिक सहाय्यता कक्ष' सुरू करण्याचे निर्देश

## गरिकांच्या तक्रारींचा ९० दिवसांत निपटारा




जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** राज्यातील ज्येष्ठ नागरिक तसेच आई-वडिलांच्या चरितार्थ व कल्याणासाठी असलेल्या 'आई-वडील व ज्येष्ठ नागरिकांचा चरितार्थ व कल्याण अधिनियम, २००७' ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून महसूल विभागाने राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांनुसार ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींची तातडीने नोंदणी करून त्यावर कार्यवाही करण्याबरोबरच संबंधित प्रकरणांचा ९० दिवसांच्या आत निपटारा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रकरणांवर प्राधान्याने सुनावणी ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित अपील प्रकरणांवर प्राधान्याने सुनावणी घेण्यात यावी, तसेच संबंधित न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या हक्कांसाठी विविध कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू नयेत, तसेच त्यांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण व्हावे, यासाठी प्रशासकीय यंत्रणेला अधिक जबाबदार करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात सहाय्यता कक्ष ज्येष्ठ नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन, तक्रार नोंदणी आणि प्रशासकीय मदत मिळावी यासाठी प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात 'ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष' सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या कक्षाच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या समस्या व तक्रारी मांडण्यासाठी सुलभ व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या हक्कांच्या संरक्षणावर भर ज्येष्ठ नागरिकांना वेळेत न्याय, सन्मान आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी शासन संवेदनशील व उत्तरदायी असून, त्यांच्या हक्कांचे प्रभावी संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सातत्याने राबविण्यात येत असल्याचे महसूल विभागाने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे राज्यातील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या तक्रारींचे जलद निराकरण, प्रशासकीय मदत आणि कायदेशीर संरक्षण मिळण्यास मदत होणार आहे.

# जळगाव विमानतळाच्या विकासाला गती द्या

## तातडीने कार्यवाहीचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचे निर्देश

जन सम्राट टाईम्स





**पारोळा। प्रतिनिधी:** जळगाव विमानतळ विकास व विस्तारीकरण प्रकल्पातील प्रलंबित प्रश्न, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या अडचणी तसेच परिसरातील विविध विकासकामांचा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेण्यात आला. विमानतळ विस्तारीकरणासाठी आवश्यक असलेली जमीन मोजणीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, तसेच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नियमानुसार मिळणारे लाभ वेळेत देण्यात यावेत, अशा सूचना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. विमानतळाच्या विस्तारीकरणामुळे बाधित होणारे रस्ते तसेच शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात जाण्यासाठी आवश्यक असलेले स्वतंत्र प्रवेशमार्ग उपलब्ध करून देण्याचे निर्देशही बैठकीत देण्यात आले. चिंचोली-नशिराबाद-उमाळा रस्त्याचे काम प्रगतिपथावर चिंचोली-नशिराबाद-उमाळा कच्च्या वहिवाट रस्त्याच्या डांबरीकरणासह पुलाच्या बांधकामाचा आढावाही यावेळी घेण्यात आला.

सदर काम प्रगतिपथावर असून, उर्वरित काम तातडीने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणेला देण्यात आल्या. अजिंठा चौफुली ते विमानतळ सौर पथदिवे जळगाव विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गाच्या सौंदर्यीकरणासोबतच प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अजिंठा चौफुली ते विमानतळ या मार्गावर सौर पथदिवे उभारण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गावरील प्रकाशव्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य "विकासाच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या हक्कांशी कोणतीही तडजोड होणार नाही. विमानतळाचा विकास आणि शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण या दोन्ही बाबी समन्वयाने साध्य कराव्यात," अशी स्पष्ट भूमिका पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी बैठकीत मांडली. विमानतळ विस्तारीकरणाच्या कामाला गती देतानाच प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याचे निर्देश देण्यात आल्याने या प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# बोदवड शहरात समस्यांचा पाऊस!

## प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचा दावा!

जन सम्राट टाईम्स




**बोदवड । (प्रतिनिधी):** बोदवड शहरात पाणीपुरवठा, रस्ते, गटारी, स्वच्छता आणि अतिक्रमणांसह विविध समस्या गंभीर बनल्या असताना प्रशासनाकडून त्याकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. विशेषतः अतिक्रमण कारवाई करताना प्रशासनाकडून दुजाभाव केला जात असल्याचा दावा काही अतिक्रमणधारकांनी केला असून, प्रांताधिकाऱ्यांच्या आदेशाचीही अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. बोदवड शहरात अनेक भागांत १५ ते २० दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा होत असल्याची तक्रार आहे. त्याचबरोबर अनेक प्रभागांतील रस्त्यांची अवस्था खराब असून पावसामुळे सर्वत्र चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. नागरिकांना पायी चालणे तसेच दुचाकी व चारचाकी वाहने चालविणेही कठीण झाले आहे. महिला शौचालयात अस्वच्छतेचे साम्राज्य मलकापूर रस्त्यावरील महिला शौचालय तसेच कैलास माळी यांच्या प्रभागातील महिला शौचालयात मोठ्या प्रमाणात घाण साचल्याचा आरोप करण्यात आला आहे. परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने महिलांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. हिरवा तलाव, नाले आणि गटारींच्या कामांवर प्रश्नचिन्ह बोदवड येथील हिरव्या तलावाच्या कामासाठी सुमारे दोन कोटी रुपये खर्च करण्यात आले. मात्र, यंदाच्या पावसाळ्यात तलाव ओसंडून वाहत असल्याने त्याच्या पाझर क्षमतेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. गांधी चौक ते शिवद्वारदरम्यानच्या नाल्यावर अतिक्रमण असल्याचा आरोप असून, त्यामुळे पावसाचे पाणी दुकानांमध्ये व घरांमध्ये शिरल्याचे सांगण्यात आले. जामठी रोड, जामनेर रोड आणि मलकापूर रोडवरील गटारी व नाले अडविण्यात आल्यामुळे पावसाळ्यात पाणी साचत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अतिक्रमण कारवाईत दुजाभावाचा आरोप बोदवड शहरात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे असल्याचा दावा करण्यात येत असून, त्यातील काही मोजक्या अतिक्रमणधारकांनाच नोटिसा बजावल्या जात असल्याचा आरोप आहे. शहरातील सुमारे १,३५२ दुकाने अतिक्रमणाच्या कक्षेत असल्याचा दावा करण्यात आला आहे. जर अतिक्रमणविरोधी कारवाई करायची असेल, तर सर्वच अतिक्रमणांवर समान पद्धतीने कारवाई करावी, अशी मागणी नोटिसा मिळालेल्या अतिक्रमणधारकांनी केली आहे.

# डॉक्टरांविरोधात युवासेनेची तक्रार; स्वतंत्र चौकशीची मागणी

## भेदभाव व अपमानास्पद वर्तनाचे आरोप; चौकशी पूर्ण होईपर्यंत निलंबनाची मागणी

जन सम्राट टाईम्स



**धुळे। प्रतिनिधी:** धुळे महानगरपालिकेच्या आयुष्मान आरोग्य मंदिर (HWC), सुलतानिया मदरसा येथील डॉ. सीमा मुजावर यांच्यावर हिंदू कर्मचाऱ्यांबाबत भेदभावपूर्ण व अपमानास्पद वर्तन केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणाची तातडीने स्वतंत्र चौकशी करून उपलब्ध पुराव्यांची सखोल तपासणी करावी, अशी मागणी युवासेना धुळे जिल्ह्याच्या वतीने महानगरपालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे. युवासेना धुळे जिल्हाध्यक्ष योगेश राजेंद्र मराठे यांनी आयुक्तांना दिलेल्या पत्रात या प्रकरणाचा उल्लेख केला आहे. तक्रारीनुसार, उपलब्ध असल्याचे सांगण्यात येत असलेल्या कॉल रेकॉर्डिंगमध्ये कर्मचाऱ्याच्या धार्मिक ओळखीचा उल्लेख करून कथित भेदभावपूर्ण संवाद झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. स्वतंत्र चौकशीची मागणी या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर संबंधित कॉल रेकॉर्डिंगसह उपलब्ध सर्व पुराव्यांची तांत्रिक व प्रशासकीय पातळीवर पडताळणी करण्यात यावी.

# 'वंदेमातरम्'लावैधानिकसंरक्षण देण्याबाबतचे विधेयक चर्चेत

## MPSC परीक्षांसाठी महत्त्वाची चालू घडामोड




जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी:** राष्ट्रीय प्रतीकांचा आणि राष्ट्रभावनेशी संबंधित चिन्हांचा सन्मान अधिक बळकट करण्याच्या पार्श्वभूमीवर 'राष्ट्रीय सन्मानाचा अपमान प्रतिबंध (दुरुस्ती) विधेयक' चर्चेत आले आहे. या प्रस्तावित कायदेबदलामुळे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' याच्या सन्मान आणि संरक्षणाशी संबंधित वैधानिक तरतुदींना अधिक स्पष्ट स्वरूप देण्याचा मुद्दा पुढे आला आहे. राष्ट्रीय गीताचा अवमान रोखण्यासाठी तसेच राष्ट्रीय अस्मितेशी संबंधित प्रतीकांचा सन्मान अबाधित ठेवण्यासाठी विद्यमान कायदेशीर चौकटीत आवश्यक सुधारणा करण्याबाबत चर्चा सुरू आहे. राष्ट्रीय प्रतीकांच्या सन्मानाला कायदेशीर अधिष्ठान देणे आणि त्यासंदर्भातील तरतुदी अधिक स्पष्ट करणे, हा या चर्चेचा प्रमुख केंद्रबिंदू आहे. राष्ट्रीय गीताच्या सन्मानावर भर 'वंदे मातरम्'ला अधिक स्पष्ट वैधानिक संरक्षण देण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय मूल्ये आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जात आहे. राष्ट्रीय गीताचा सन्मान राखणे आणि त्याच्या अवमानास प्रतिबंध करणे यासाठी कायदेशीर तरतुदी अधिक प्रभावी करण्याच्या दिशेने या विधेयकाकडे पाहिले जात आहे. राष्ट्रीय प्रतीके आणि राष्ट्रीय गीतांशी संबंधित कायदे, त्यांची घटनात्मक पार्श्वभूमी तसेच त्यातील प्रस्तावित बदल यामुळे हा विषय राज्यशास्त्र व चालू घडामोडींच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा ठरत आहे. UPSC-MPSC परीक्षांसाठी महत्त्वाची घडामोड राष्ट्रीय सन्मान, राष्ट्रीय प्रतीके, घटनात्मक मूल्ये आणि संबंधित कायदे हे विषय UPSC, MPSC तसेच अन्य स्पर्धा परीक्षांमध्ये विचारले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रस्तावित विधेयक, त्यामागील उद्देश आणि राष्ट्रीय गीताच्या वैधानिक संरक्षणाशी संबंधित तरतुदी यांचा अभ्यास विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

# 'एक पेड माँ के नाम 3.0' अंतर्गत बोदवड येथे वृक्षारोपण

## सर सत्यजित राम नेमाडे विद्यालयात वन महोत्सव; विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व पटवून दिले

जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी :** राष्ट्रीय शिक्षण संस्था, बोदवड संचलित सर सत्यजित राम नेमाडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात सामाजिक वनीकरण विभाग, परीक्षेत्र जळगाव आणि बोदवड नगरपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने केंद्र शासनाच्या 'एक पेड माँ के नाम 3.0' अभियानांतर्गत वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास सामाजिक वनीकरण विभाग, परीक्षेत्र जळगावचे आरएफओ सौरव पाटील प्रमुख आयोजक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनंतराव कुलकर्णी होते. बोदवड पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आशिष लव्हंगडे यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी पीएसआय स्वाती एडके, बोदवड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सतीश पुदाके, माजी नगराध्यक्ष सईद बागवान, न. ह. रांका हायस्कूलचे एनसीसी प्रमुख सावळे सर, तंबाखूमुक्त अभियानाचे तालुका समन्वयक तथा रेणुका माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक मराठे सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. जी. हजारी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षतोडीमुळे पर्यावरणीय बदल मार्गदर्शन करताना आरएफओ




सौरव पाटील यांनी सध्याच्या काळात निसर्गात होत असलेले बदल, तापमानातील वाढते चढ-उतार आणि अवकाळी पावसाचे वाढते प्रमाण यामागे मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड हे एक महत्त्वाचे कारण असल्याचे सांगितले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन व संवर्धन करणेही तितकेच आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारून आपल्या परिसरात अधिकाधिक झाडे लावावीत, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अमर सुनगत यांनी केले. वन महोत्सव यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. बोदवड नगरपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने केंद्र शासनाच्या

'एक पेड माँ के नाम 3.0' अभियानांतर्गत वन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या परिसरात विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमास सामाजिक वनीकरण विभाग, परीक्षेत्र जळगावचे आरएफओ सौरव पाटील प्रमुख आयोजक म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनंतराव कुलकर्णी होते. यावेळी पीएसआय स्वाती एडके, बोदवड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सतीश पुदाके, माजी नगराध्यक्ष सईद बागवान, न. ह. रांका हायस्कूलचे एनसीसी प्रमुख सावळे सर, तंबाखूमुक्त अभियानाचे तालुका समन्वयक तथा रेणुका माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक मराठे सर, विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. जी. हजारी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षतोडीमुळे पर्यावरणीय बदल मार्गदर्शन करताना आरएफओ सौरव पाटील यांनी सध्याच्या काळात निसर्गात होत असलेले बदल, तापमानातील वाढते चढ-उतार आणि अवकाळी पावसाचे वाढते प्रमाण यामागे मोठ्या प्रमाणात होत असलेली वृक्षतोड हे एक महत्त्वाचे कारण असल्याचे सांगितले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन व संवर्धन करणेही तितकेच आवश्यक आहे.

# अतिक्रमणांवर कारवाई न झाल्याने भारतीय संविधान सेनेचे उपोषण!

## धुळे शहरातील अतिक्रमणे हटवून कायदेशीर खुलासा करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स



**धुळे |प्रतिनिधी :** धुळे शहरातील विविध अतिक्रमणांबाबत यापूर्वी तक्रार निवेदने देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप करत भारतीय संविधान सेनेचे राज्य प्रवक्ते संतोष (आबा) अमृतसागर यांनी रविवार, ९ ऑगस्ट २०२६ पासून जेल रोड येथील 'आंदोलन भूमी' अर्थात 'संविधान जागर आंदोलन' स्थळी आमरण उपोषण सुरू केले आहे. शहरातील कथित बेकायदेशीर अतिक्रमणे तातडीने हटवावीत, संबंधित बांधकामांची कागदपत्रे सार्वजनिक करावीत आणि आंदोलनस्थळाबाबत प्रशासनाने कायदेशीर व लेखी खुलासा द्यावा, अशा प्रमुख मागण्या संघटनेने केल्या आहेत.भारतीय संविधान सेनेने यापूर्वी ८ जून २०२६ रोजी धुळे महापालिका मुख्य इमारतीलगत सार्वजनिक रस्त्यावर 'बाबासाहेब कोतवाल ट्रस्ट'च्या कथित अतिक्रमणाबाबत तसेच १० जुलै २०२६ रोजी जेल रोड येथील आंदोलनस्थळ, व्यापाऱ्यांचे कथित नियमबाह्य गाळे आणि मूलभूत सुविधांबाबत तक्रार निवेदने दिली होती. मात्र, दीर्घ कालावधी उलटूनही या तक्रारींवर ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

**९ मीटर सार्वजनिक रस्त्यावरील बांधकामाबाबत चौकशीची मागणी**

धुळे महापालिकेच्या मुख्य इमारतीलगत मंजूर विकास आराखड्यातील ९ मीटर सार्वजनिक रस्त्याच्या जागेवर 'बाबासाहेब कोतवाल ट्रस्ट'च्या माध्यमातून कथितपणे आरसीसी बांधकाम व व्यापारी अतिक्रमण करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या बांधकामास आवश्यक परवानग्या आहेत का, याची तपासणी करून बांधकाम बेकायदेशीर आढळल्यास ते तातडीने निष्कासित करावे, तसेच संबंधित बांधकामाची सर्व कागदपत्रे सार्वजनिक करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

**जेल रोडवरील आंदोलनाची जागा मोकळी करण्याची मागणी**

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनास मनाई केल्यानंतर प्रशासनाने जेल रोडवरील माईन क्लब ते मध्यवर्ती कारागृहदरम्यानची जागा आंदोलनासाठी निश्चित केली होती.

मात्र, पाच कंदील परिसरातील शंकर मार्केट व इतर व्यापाऱ्यांच्या पुनर्वसनाच्या नावाखाली या जागेत मोठ्या आकाराचे पत्र्याचे शेड व गाळे उभारण्यात आल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. व्यापाऱ्यांना तात्पुरत्या स्वरूपात जागा कोणत्या कायद्यानुसार, कोणत्या शासन परिपत्रकानुसार आणि महानगरपालिकेच्या कोणत्या ठरावानुसार देण्यात आली, याचा सविस्तर लेखी खुलासा प्रशासनाने करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

तसेच आंदोलनासाठी राखीव असलेली जागा अडथळामुक्त व मोकळी करण्यात यावी, अशीही मागणी आहे.

**महापालिकेचे मागील गेट खुले करण्याची मागणी**

जुन्या महापालिका इमारतीच्या मागील बाजूस असलेले गेट अनेक वर्षांपासून बंद असल्याने मनपा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या महिला, रुग्ण व नागरिकांना मोठा वळसा घालावा लागत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. या गेटवरील अनधिकृत अतिक्रमणे हटवून महिला व नागरिकांच्या दळणवळणासाठी तसेच रुग्णालयाकडे जाण्यासाठी ते तातडीने खुले करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

**मुख्य रस्ते आणि महामार्ग अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी**

धुळे शहरातील जुन्या मुंबई-आग्रा महामार्गासह विविध प्रमुख रस्त्यांवर राजकीय व सामाजिक संघटनांची कार्यालये, व्यक्ती आणि व्यापाऱ्यांकडून अतिक्रमणे करण्यात आल्याचा आरोप संघटनेने केला आहे. या अतिक्रमणांमुळे दररोज वाहतूक कोंडी निर्माण होत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शहरातील तसेच महामार्गावरील सर्व अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करून रस्ते नागरिकांसाठी मोकळे करावेत, अशी मागणी भारतीय संविधान सेनेने केली आहे. जेल रोड येथील 'संविधान जागर आंदोलन'स्थळी आंदोलकांसाठी तात्पुरते पत्र्याचे शेड उभारण्यात आले असून, पाऊस व उन्हापासून संरक्षणासाठी त्याचा उपयोग होत असल्याचे संघटनेने सांगितले.

रात्रीच्या वेळी आंदोलन करताना अडचण येऊ नये यासाठी लाईट व पंख्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

# ठाकूर अनुसूचित जमात मंडळातर्फे जागतिक आदिवासी दिन उत्साहात

## बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन



जन सम्राट टाईम्स

**प्रतिनिधी:** ठाकूर अनुसूचित जमात मंडळाच्या वतीने जागतिक आदिवासी दिन विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाची समृद्ध संस्कृती, परंपरा, इतिहास आणि सामाजिक योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी मंडळाचे पदाधिकारी, समाजबांधव, महिला, युवक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, जल-जंगल-जमीनशी असलेले अतूट नाते, पारंपरिक कला, संस्कृती आणि रूढी-परंपरा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात आले. आदिवासी समाजाची संस्कृती आणि परंपरा जपण्यासोबतच शिक्षण, संघटन आणि सामाजिक विकासाला प्राधान्य देण्याचा संकल्प यावेळी ठाकूर अनुसूचित जमात मंडळाच्या वतीने करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा केला.

जन सम्राट टाईम्स — सत्याचे प्राईम्स — ब्रेक न्यूज — ज

# कष्टकरी कुटुंबातील भगवान नन्नवरे यांना वकिलीची सनद

## मुंबई कोर्टात करणार वकिली




जन सम्राट टाईम्स

**सतखेडा |प्रतिनिधी :** कष्टकरी कुटुंबातील युवकाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिक्षणाच्या जोरावर मिळवलेल्या यशामुळे सतखेडा गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. भगवान अंकुश नन्नवरे यांनी मेहनत, जिद्द आणि संघर्षाच्या बळावर वकिलीचे शिक्षण पूर्ण करून वकिलीची सनद प्राप्त केली असून, आता ते मुंबई कोर्टात वकील म्हणून कार्यरत होणार आहेत. त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. भगवान नन्नवरे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना प्रेरणास्थान मानत शिक्षण आणि संघर्षाचा मार्ग स्वीकारला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या विचारांना आपल्या जीवनात उतरवत त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षण पूर्ण केले. भगवान यांचे वडील अंकुश नाना नन्नवरे यांनी हातमजुरी व मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही मुलाच्या शिक्षणाला त्यांनी प्रोत्साहन दिले. स्वतःच्या कष्टावर शिक्षण पूर्ण करत भगवान यांनी 'स्वतः कमवा आणि स्वतः शिका' या विचारातून आपली वाटचाल सुरू ठेवली. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि शिक्षणाच्या माध्यमातून ध्येय गाठता येते, हे भगवान नन्नवरे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. एका सामान्य कष्टकरी कुटुंबातील मुलाने मुंबई कोर्टात वकील म्हणून प्रवेश मिळवणे ही त्यांच्या परिवारासोबतच संपूर्ण गावासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. भगवान यांच्या यशामुळे सतखेडा ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या यशाकडे गावातील युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण म्हणून पाहिले जात आहे. त्यांच्या यशाने वडील अंकुश नाना यांच्या कष्टाचेही सार्थक झाल्याची भावना व्यक्त होत आहे. भगवान नन्नवरे यांना वकिलीची सनद मिळाल्याबद्दल ग्रामस्थ, मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या हातून गोरगरीब, कष्टकरी आणि गरजू नागरिकांना न्याय मिळवून देण्याचे कार्य घडावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत. शिक्षणाची वाट, संघर्षाची साथ आणि बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा घेऊन मुंबई कोर्टात वाटचाल करणाऱ्या सतखेडा गावच्या या सुपुत्राचे यश निश्चितच तरुणांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

# 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत महात्मा फुले हायस्कूलमध्ये वृक्षारोपण!

## सामाजिक वनीकरण विभागाकडून १०० वृक्षांची रोपे भेट

जन सम्राट टाईम्स




**धरणगाव| प्रतिनिधी:** 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गत धरणगाव शहरातील महात्मा फुले हायस्कूल येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक वनीकरण विभाग, धरणगावच्या वतीने शाळेला विविध प्रजातींची १०० वृक्षांची रोपे भेट देण्यात आली. सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी बी. बी. सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल आर. यू. घोडे, एन. एन. शिरसागर तसेच वनरक्षक एस. आय. शिंदे यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर वनपाल आर. यू. घोडे यांच्या हस्ते शाळेतील उपशिक्षक पी. डी. पाटील व एच. डी. माळी यांच्याकडे वृक्षांची रोपे सुपूर्द करण्यात आली. यानंतर शाळेच्या परिसरात शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हस्ते नीम, वड, पिंपळ यांसह विविध वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपणाबरोबरच विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व आणि त्यांच्या संवर्धनाची गरज याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी वनपाल आर. यू. घोडे म्हणाले की, सध्याच्या काळात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ वृक्षलागवड करून उपयोग नाही, तर लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करून ते जगविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना निर्माण होऊन शाळेच्या परिसरात हिरवाई वाढण्यास मदत होणार आहे. वृक्षारोपण कार्यक्रमात शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले, तर एच. डी. माळी यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर वनपाल आर. यू. घोडे यांच्या हस्ते शाळेतील उपशिक्षक पी. डी. पाटील व एच. डी. माळी यांच्याकडे वृक्षांची रोपे सुपूर्द करण्यात आली. यानंतर शाळेच्या परिसरात शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हस्ते नीम, वड, पिंपळ यांसह विविध वृक्षांच्या रोपांची लागवड करण्यात आली. सध्याच्या काळात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे अत्यंत आवश्यक आहे. केवळ वृक्षलागवड करून उपयोग नाही, तर लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करून ते जगविणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा संदेश देत त्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षसंवर्धनाचे महत्त्व समजावून सांगितले.

# फुले हायस्कूलमध्ये 'शून्य सर्पदंश' अभियान

## सर्पदंश प्रथमोपचार, विषारी-बिनविषारी सापांची माहिती

जन सम्राट टाईम्स




**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव शहरातील सुवर्ण महोत्सवी महात्मा फुले हायस्कूल येथे वन्यजीव संरक्षण संस्था, जळगाव आणि जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'शून्य सर्पदंश' अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना विषारी व बिनविषारी सापांची ओळख, सर्पदंश झाल्यानंतर घ्यावयाची प्रथमोपचाराची काळजी तसेच सापांबाबतच्या अंधश्रद्धांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पी. डी. पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक एम. बी. मोरे होते. प्रमुख अतिथी म्हणून वन्यजीव संरक्षण संस्था, जळगावचे सचिव प्रदीप शेळके, सदस्य राजेश सोनवणे, हेमराज सपकाळे, तसेच सर्पमित्र निलेश चौधरी, रामलाल बोरसे आणि गणेश गुरव उपस्थित होते. मान्यवरांचे शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. नाग, मण्यार, फुरसे यांची विद्यार्थ्यांना माहिती यावेळी हेमराज सपकाळे यांनी नाग, मण्यार आणि फुरसे या प्रमुख विषारी सापांची ओळख, त्यांचे वास्तव्य आणि त्यांच्यापासून घ्यावयाची काळजी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. त्यानंतर राजेश सोनवणे यांनी विविध बिनविषारी सापांची माहिती देत सापांबाबत समाजात असलेल्या गैरसमज व अंधश्रद्धा दूर करण्याचे आवाहन केले. सर्पमित्र निलेश चौधरी, रामलाल बोरसे आणि गणेश गुरव यांनी प्रत्यक्ष सर्पांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सापांची वैशिष्ट्ये समजावून सांगितली. साप पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून, विशेषतः शेतीसाठी त्याचे महत्त्व मोठे आहे. 'सर्प हा शेतकऱ्यांचा मित्र आहे; त्यामुळे सापांना मारण्याऐवजी त्यांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे,' असे त्यांनी सांगितले. सर्पदंशानंतर प्रथमोपचाराचे प्रात्यक्षिक वन्यजीव संरक्षण संस्थेचे सचिव प्रदीप शेळके यांनी सर्पदंश झाल्यानंतर घाबरून न जाता कोणती खबरदारी घ्यावी, रुग्णाला कशा पद्धतीने सुरक्षितपणे रुग्णालयात न्यावे आणि कोणत्या चुकीच्या उपचारांपासून दूर राहावे, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी प्रथमोपचाराचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक (डेमो) करून दाखविले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी सर्पांशी संबंधित विविध प्रश्न विचारले. उपस्थित तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. सर्पमित्रांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाच्या निमित्ताने शाळेच्या मैदानात सर्पमित्रांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. वन्यजीव व पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पी. डी. पाटील यांनी केले, तर एच. डी. माळी यांनी आभार मानले. वन्यजीव संरक्षण, सर्पसंवर्धन आणि सर्पदंशाबाबत योग्य माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्याने हा जनजागृती उपक्रम उपयुक्त ठरला.

# भाजप रावेर उत्तर व दक्षिण मंडळाची विशेष संघटनात्मक बैठक संपन्न

## तिरंगा रॅली, SIR आढावा, बूथनिहाय नियोजनासह आगामी संघटनात्मक उपक्रमांवर चर्चा

जन सम्राट टाईम्स

**रावेर । प्रतिनिधी:** भारतीय जनता पार्टीच्या रावेर उत्तर व दक्षिण मंडळाच्या वतीने विशेष संघटनात्मक व मार्गदर्शनपर बैठकीचे आयोजन करण्यात आले. आगामी संघटनात्मक कार्यक्रम, तिरंगा रॅली तसेच पक्षाच्या विविध उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी १५ ऑगस्ट 'अखंड भारत संकल्प दिना'निमित्त रावेर उत्तर व दक्षिण मंडळाच्या वतीने भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्याबाबत नियोजन करण्यात आले. तसेच १२ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या छत्रपती संभाजीनगर येथील तिरंगा रॅलीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक नियोजन व तयारीचा आढावा घेण्यात आला. बैठकीत SIR आढावा बैठक, बूथ व




शक्ती केंद्र स्तरावरील जबाबदाऱ्यांचे नियोजन, आगामी संघटनात्मक कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यावरही चर्चा झाली. यासोबतच रावेर येथे आयोजित करण्यात येणाऱ्या रोजगार मेळाव्याच्या नियोजनाबाबत पदाधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली. बैठकीला भाजपा जिल्हा सरचिटणीस डॉ. केतकी पाटील, प्रदेश सदस्य सुरेश धनके, मंडळ अध्यक्ष रवींद्र पाटील, ॲड. सूर्यकांत देशमुख यांच्यासह रावेर तालुक्यातील आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, तालुका कार्यकारिणी सदस्य, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख, BLA-2, महिला मोर्चा, युवा मोर्चा तसेच पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी काळात पक्षाच्या संघटनात्मक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक स्तरावरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# रावेर येथे अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात मोर्चा

## तहसीलदार दीपा जेधे यांना निवेदन; अनंत बदर समितीचा अहवाल रद्द करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स



**रावेर | प्रतिनिधी:** अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या विरोधात रावेर येथे अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण विरोधी मोर्चा कृती समितीच्या वतीने भव्य मोर्चा काढण्यात आला. विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार दीपा जेधे यांना देण्यात आले. मोर्चाची सुरुवात येथील छोरिया मार्केट येथून झाली. मोर्चात सहभागी समाजबांधवांनी हातात निळे ध्वज, विविध मागण्यांचे फलक घेत आरक्षणाच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या. "आरक्षण आमच्या हक्काचं, नाही कुणाच्या बापाचं!" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पोहोचल्यानंतर नगरसेवक नरेंद्र वाघ, नगरसेविका अनिता तायडे आदींच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर मोर्चा तहसील कार्यालयाकडे रवाना झाला. तहसील कार्यालयाजवळ मोर्चाचे सभेत रूपांतर झाले. यावेळी निळे निशाण संघटनेचे अध्यक्ष आनंद बाविस्कर, कामगार नेते दिलीप कांबळे, ॲड. योगेश गजरे, उमेश गाढे, मनोहर तायडे, ॲड. दीपक तायडे, आत्माराम तायडे यांनी मनोगत व्यक्त केले. निवेदनाचे वाचन संघरत्न दामोदरे यांनी केले. यानंतर कृती समितीच्या शिष्टमंडळाने तहसीलदार दीपा जेधे, निवासी नायब तहसीलदार संजय तायडे आणि पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना मागण्यांचे निवेदन दिले. मोर्चाच्या माध्यमातून एकल सदस्यीय अनंत बदर समितीचा अहवाल तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच हा अहवाल महाराष्ट्रातील नागरिकांसमोर सार्वजनिक करण्यात यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. समितीच्या अहवालावर मोठ्या प्रमाणात आक्षेप व सूचना प्राप्त झाल्याचा दावा करत, त्यावर विविध स्तरांवर सुनावणी घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. सुनावणीदरम्यान अनुसूचित जातीतील प्रत्येक जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधी समितीवर नियुक्त करावेत आणि त्यांच्या मतांच्या आधारे अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करण्यात यावा, अशी भूमिका आंदोलकांनी मांडली. मोर्चात समाजबांधवांचा मोठा सहभाग मोर्चात आनंद बाविस्कर, दिलीप कांबळे, उमेश गाढे, प्रदीप सपकाळे, ॲड. योगेश गजरे, संघरक्षक तायडे, दिलीप साबळे, नगरसेवक नरेंद्र वाघ, नगरसेविका अनिता तायडे, प्रशांत गाढे, धुमा तायडे, निलेश नन्नवरे, बाळू शिरतुरे, आत्माराम तायडे, मनोहर तायडे, सावन मेढे, महेश तायडे, विजय भोसले, ॲड. दीपक तायडे, विजय अवसरमल, विनोद मोरे, महेंद्र कोचुरे, राजेंद्र अटकाळे, साहेबराव वानखेडे, रवी तायडे, ॲड. आनंद वाघोदे, संघरत्न दामोदरे, सदाशिव निकम, रवींद्र रायपुरे, राहुल गाढे, चांगो भालेराव यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सपकाळे यांनी केले.

# लाल किल्ल्यावर प्रथमच गूंजणार 'वंदे मातरम्'!



जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी:** यंदाचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशासाठी ऐतिहासिक ठरणार आहे. दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्याच्या प्राचीरवरून स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य सोहळ्यात राष्ट्रगीतापूर्वी राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ची अधिकृत प्रस्तुती करण्याची तयारी करण्यात आली आहे. त्यामुळे यंदाच्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य सोहळ्यात 'वंदे मातरम्' संरक्षण मंत्रालयाच्या नियोजनानुसार, स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवल्यानंतर आणि त्यांच्या संबोधनाच्या समारोपानंतर राष्ट्रगीतापूर्वी 'वंदे मातरम्' सादर केले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. राष्ट्रीय गीताला स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात असलेले महत्त्व लक्षात घेता हा निर्णय विशेष मानला जात आहे. यंदाचा ८० वा स्वातंत्र्यदिन देशासाठी ऐतिहासिक ठरणार आहे.स्वातंत्र्यदिनाच्या मुख्य सोहळ्यात राष्ट्रगीतापूर्वी राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'ची अधिकृत प्रस्तुती करण्याची तयारी करण्यात आली.